# जिल्हाधिकारी कार्यालय,जालना

प्रशासकीय इमारत, स.नं. ४८८, जालना

(जिल्हा नियंत्रणक कक्ष)/(आपत्ती व्यवस्थापन)

दुरध्वनी क्रमांक [02482]-223132 टोल फ्री क्रमांक 1077 फॅक्स क्रमांक (02482)-226477,225326

E-mail. rdcjalna@gmail.com, jalnaddmo@gmail.com Website: - www.jalna.gov.in, http://59.90.142.57/ddmajalna

जा.क्र.२०२०/मशाका/जिनिक/आव्यप्र/कावि-

(ई-मेलने/टपालाने) **आपत्ती प्राधान्य** दिनांक २२/०३/२०२०

**वाचा:-**

१) आपत्ती व्यवस्थापन अधिनियम २००५.

२) महाराष्ट्र शासन, सार्वजनिक आरोग्य विभाग यांचेकडील अधिसूचना दिनांक १३/०३/२०२०.

३) महाराष्ट्र शासन, सार्वजनिक आरोग्य विभाग यांचेकडील अधिसूचना दिनांक १४/०३/२०२०.

## आदेश

ज्याअर्थी राज्य शासनाने संदर्भीय २ अन्वये करोना विषाणूचा (कोव्हीड १९) प्रादुर्भाव रोखण्यासाठी राज्यात साथरोग प्रतिबंधात्मक कायदा १८९७ दिनांक १३ मार्च २०२० पासून लागू करुन खंड २,३, व ४ मधील तरतुदींची अंमलबजावणीसाठी अधिसूचना निर्गमित केलेली आहे. त्याबाबतची नियमावली संदर्भीय ३ अन्वये प्रसिध्द केली आहे आणि जिल्हाधिकारी यांना सक्षम प्राधिकारी घोषित केलेले आहे. त्याबाबतची नियमावली संदर्भीय २ अन्वये प्रसिध्द केली आहे. आणि जिल्हाधिकारी यांना सक्षम प्राधिकारी घोषीत केलेले आहे.

ज्याअर्थी आर्थिक वर्षाच्या कामकाजासाठी बँकांमध्ये मोठया प्रमाणात गर्दी होत असून त्याव्दारे कोरोना आजाराचा संसर्ग पसरण्याची शक्यता निर्माण झालेली आहे व कोरोना विषाणूचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाययोजनेचा एक भाग म्हणून जालना जिल्हयातील सर्व बँकांनी उपाययोजना करणे आवश्यक झाले आहे.

आणि ज्याअर्थी, महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र कोव्हीड १९ उपाययोजना नियम, २०२० लागू केले आहे.

त्याअर्थी राज्य शासनाचे संदर्भीय २ अन्वये मला प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करुन मी रविंद्र बिनवडे जिल्हाधिकारी, जालना जिल्हयातील सर्व बँकांना खाली दिलेल्या मार्गदर्शक सूचनांची अंमलबजावणी आदेशाच्या दिनांकापासून काटेकोरपणे करण्याकरिता आदेशित करत आहे.

१) सर्व बंकॉनी ३१ मार्च २०२० पर्यंत फक्त रोख भरणा करणे व काढणे ही दोनच कामे प्राधान्याने करावी.

२) बँकांनी एका वेळेस जास्तीत जास्त ४ ते ५ ग्राहकांना शाखेमध्ये येण्यास परवानगी दयावी व प्रवेश केलेल्या ग्राहकांचे काम झाल्या शिवाय पुढिल ग्राहकाला बँकेत आत प्रवेश देवू नये. दोन ग्राहकांमध्ये १ मीटरचे अंतर ठेवावे.

३) सर्व बँकांनी आपल्या ग्राहकांना इतर विवरण पर्यायाचा म्हणजेच इंटरनेट बँकिग, मोबाईल बँकिंग व युपीआय, एटीएम, कॅश डिपॉझीट मशीन इ. सुविधांचा वार करणेबाबतीत जागृती व आवाहन करावे.

४) बँकत ग्राहकांना काऊन्टर पासून १ मीटर अंतर ठेवण्यास सुचित करावे.

५) सर्व बँकानी आपल्या एटीएम, कॅश / चेक डीपॉझीट, पासबुक, प्रिंटिग ई. सेवा असणा-या मशीनची वेळोवेळी स्वच्छता करावी. सर्व कर्मचा-यांना व ग्राहकांना सॅनीटायझर, हॅण्डवॉश, जंतूनाशक अथवा साबण हात धुण्याची व्यवस्था करावी.

तरी उपरोक्त निर्देशानुसार तात्काळ कार्यवाही करण्याबाबत आपल्या अधितत्याखाली सर्व आस्थापनांना सूचित करण्यात यावे त्याबाबतचा अनुपालन अहवाल या कार्यालयास सादर करावा.

उपरोक्त आदेश पालन न करणा-या कोणत्याही व्यक्तिने अथवा संस्थेने भागरतीय दंडसंहिता १८६० (४५) यांच्या कलम १८८ शिक्षेसपात्र असलेला अपराध केला असे मानण्यात येईल व पुढिल कार्यवाही करण्यात येईल.

Ravindra Laxman Binwade

Digitally signed by Ravindra Laxman Binwade
Date: 2020.03.22 20:35:09 +05'30'

**(रविंद्र बिनवडे)**

**जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष**

**जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, जालना**

**प्रति,**

१) व्यवस्थापक, जिल्हा अग्रणी बँक, जालना यांना देवून आदेशीत करण्यात येते की, आपले अधिनस्त सर्व बँकांना वरील आदेश तामील करुन अनुपालन अहवाल सादर करावा.

२) सर्व बँक शाखा व्यवस्थापक, जालना (मार्फत व्यवस्थापक जिल्हा अग्रणी बँक, जालना)

३) जिल्हा निबंधक सहकारी संस्था, जालना यांना देवून आदेशीत करण्यात येते की, आपले अधिनस्त सर्व सहकारी बँकांना वरील आदेश तामील करुन अनुपालन अहवाल सादर करावा.

**प्रत,**

१) मा.विभागीय आयुक्त, औरंगाबाद यांना माहितीस्तव सविनय सादर.